## वादीतर्फे साक्षीदार क्र.०२ यांचा शपथेवर पुढील सरतपास ॲड. श्री. बी.व्ही.जायभाय यांचे मार्फत सुरू.

०१. माझे प्रतिज्ञापत्रतील मजकुर माझे वकीलांनी माझे सांगण्याप्रमाणे लिहला असून, तो खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. तो **निशाणी क्र.२८** वर आहे.

**मी प्रस्तुत प्रकरणात खालील प्रमाणे दस्ताऐवज दाखल केलेले आहेत.**

१. मी प्रतिवादी क्र.१ कडून शेत विकत घेतले होते. त्या खरेदीखताची प्रमाणित प्रत मी अभिलेखावर दाखल केली असून, आता मला सदरचे खरेदीखत दाखविण्यात आले. त्यावर प्रतिवादी क्र.१ ची सही विकत देणार म्हणून व इतर दोन साक्षीदारांच्या सह्या आहेत. त्यावर उप–निबंधक कार्यालय, जामखेड यांचा सही व शिक्का आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदरच्या खरेदीखताच्या वेळी मी उपनिबंधक कार्यालय, जामखेड येथे हजर नव्हतो. त्यावेळी, माझे भाऊ नामे भास्कर राजाराम गायकवाड हे माझ्या वतीने कार्यालयात उपस्थित होते. सदरचा खरेदीखताचा स्टॅप प्रतिवादी क्र. १ च्या नावाने विकत घेण्यात आलेला होता. ( सदरच्या दस्तास प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या विव्दान वकीलांनी असा आक्षेप नोंदविला की, सदरच्या दस्तावर प्रस्तुत साक्षीदाराची अथवा त्यांचा भाऊ भास्कर यांची विकत घेणार म्हणून सही नाही, तसेच सदरचा दस्त हा प्रमाणित दस्त असल्याने त्यास निशाणी देण्यात येवु नये. याउलट वादींच्या विव्दान वकीलांनी असा युक्तीवाद मांडला की, सदरचे खरेदीखत सन–१९९४ मधील असल्याने त्यावेळी विकत घेणा–याची सही उप–निबंधक कार्यालयामार्फत घेतली जात नव्हती. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. सदरच्या खरेदीखताचे अवलोकन केले असता, सदरचा दस्त हा दिनांक २८.०४.१९९४ रोजी उप–निबंधक कार्यालय, जामखेड येथे नोदणीकृत करण्यात आल्याचे दिसून येते. तसेच सदरचा दस्त हा ३० वर्षापेक्षा जास्त जुना असल्याने व कोणत्याही दस्तास निशाणी देणे हे न्यायालयाचे प्रधान कार्य असल्याने, तसेच प्रतिवादीस सदरच्या दस्तावर उलटतपास घेण्याची मुभा असल्याने) त्यास **निशाणी क्र. २९** देण्यात येते.

**... सर तपास पुर्ण.**

**उलट तपासणी**
**प्रतिवादीं तर्फे श्री.जे.एम.कोल्हे , वकील**

२. माझे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झालेले आहे. मी गेल्या २० वर्षापासून अहमदनगर येथे वास्तव्यास आहे. मी अहमदनगर येथील एम.आय.डी.सी.मध्ये मजुरी काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी नगर येथील कारखान्यामध्ये कायमस्वरूपी नोकरीला आहे. मी वादी क्र. १ चा पुर्ण जबाब वाचला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी प्रस्तुतचे माझे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र. १ ने सांगितल्यावरून माझे शपथपत्र तयार करण्यात आले. मी वादी क्र.१ ला वादमिळकती पैकी ३५ आर क्षेत्र विकले. हे म्हणणे खरे आहे की, मी पोटखराब क्षेत्राचे खरेदीखत वादी क्र. १ ला करून दिले नाही. असे काही झाले नाही की, मी वादी क्र. १ ला एकूण ४१ आर क्षेत्राची विक्री केली. आता मला खरेदीखत **(निशाणी क्र.२७)** दाखविण्यात आली. त्यातील मी वादी क्र. १ ला एकूण ४१ आर क्षेत्र विकल्याचा उल्लेख असुन तो बरोबर आहे. शपथपत्रातील मजकुर खरा आहे व खरेदीखतातील ४१ आर क्षेत्राच्या खरेदीचा उल्लेख चुकीचा आहे. प्रतिवादी क्र.१ ने मला खरेदीखतान्वये ३५ आर क्षेत्र विकले होते. हे म्हणणे खरे आहे की, मला प्रतिवादी क्र. १ ने ४१ आर क्षेत्र विकले नव्हते. मी माझ्या नावे एकूण ४१ आर क्षेत्रावर नोंद लावली. हे म्हणणे खरे नाही की, सदरची नोंद चुकीची आहे. माझ्या नावे ६ आर क्षेत्र लागल्याबाबत मी तलाठ्याकडे कोणताही अर्ज केला नव्हता. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, वादी क्र. २ व प्रतिवादी क्र. १ यांच्या वाटपपत्रामुळे सदरच्या ६ आर क्षेत्राची नोंद माझ्या नावे लागली. सदरच्या खरेदीखतानंतर वादी क्र. २ व प्रतिवादी क्र. १ यांच्यात वाटप झाले. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या वाटपपत्राबाबत माझ्याकडे कोणताही लेखी पुरावा नाही.

३. मी खरेदीखत करतेवेळी वाद मिळकतीचा ७/१२ उतारा पाहिला होता. हे मी सांगु शकत नाही की, माझ्या खरेदीखताच्या पुर्वी ७/१२ उता–यामध्ये कोणाच्या नावे किती क्षेत्र होते व कसे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या खरेदी नंतर मी आजपावेतो वाद मिळकतीच्या ७/१२ उता–

यांची पाहणी केली नाही. गट क्र.६८३ मध्ये प्रतिवादी क्र. १ चे क्षेत्र, मी सांगु शकत नाही. खरेदी खताच्या वेळी गट क्र.६८३ प्रतिवादी क्र. १ व्यतिरिक्त नेमके कोणाच्या नावे होते, हे मी सांगु शकत नाही. मी ओंकार रामकिसन गायकवाड यांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, ओंकारच्या आईचे नाव राजुबाई असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, ओंकार हा प्रतिवादी क्र.१ चा मुलगा नाही. हे मला माहिती नाही की, मी वाद मिळकतीचे खरेदीखत घेतेवेळी ओंकारच्या नावे ६३ आर क्षेत्र होते किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखताच्या दिवशी मी वाद मिळकतीचा ७/१२ उतारा पाहिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखताच्या दिवशी माझे भाऊ भास्कर उप–निबंधक कार्यालय, जामखेड येथे माझ्या वतीने हजर नव्हते. मी वाद मिळकत विकत घेतेवेळी वर्तमानपत्रात जाहिर नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सन–१९९४ मध्ये मी वाद मिळकत विकत घेतेवेळी ७/१२ उता–यावर बँक ऑफ महाराष्ट्र, जातेगावचा कर्जाचा बोजा होता. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकत विकतेवेळी वाद मिळकतीवर बँक ऑफ महाराष्ट्र जातेगावचा कर्जाचा बोजा होता. हे म्हणणे खरे आहे की, सन–१९९४ मध्ये वाद मिळकत विकत घेतेवेळी दिशा दाखविण्यात आल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्यामध्ये वाटप झालेले नव्हते.

**( प्रतिवादींचे विद्वान वकीलांनी प्रस्तुतचे प्रकरण पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यास विनंती केल्यावरून शेवटची संधी म्हणून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला. )**

श्रवणोत्तर स्वीकृत.

दिनांकः ०२/०३/२०२४

स्वाक्षरी/–
(व्ही. व्ही. जोशी )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड.